## In the News

Publication: **Pudhari** | Region: **Pune** | Date: **21/01/2018** | Page No.: **02**

# महाबँकेची रिलायन्स निप्पॉनशी भागीदारी

**पुणे** : बँक ऑफ महाराष्ट्रने रिलायन्स निप्पॉन लाईफ इन्शुरन्स या कंपनीशी आयुर्विमा विकण्याबाबत व्यापक करार केला आहे. यातून बँक ऑफ महाराष्ट्रच्या मोठ्या ग्राहकसंख्येचा लाभ घेणे रिलायन्स निप्पॉन कंपनीला शक्य होईल, तसेच याद्वारे बँकेच्या कारभारात इतर सेवांची भर पडून बँकेची आर्थिक स्थिती अधिक भक्कम होण्यास मदत मिळणार आहे.

बँक ऑफ महाराष्ट्रचे संपूर्ण देशामध्ये आणि विशेषत: महाराष्ट्र राज्यामध्ये महानगरीय, शहरी आणि ग्रामीण भागामध्ये शाखांचे व्यापक जाळे आहे. या शाखांद्वारे रिलायन्स निप्पॉन लाईफ इन्शुरन्सला अधिकाधिक ग्राहकांपर्यंत पोहोचता येईल. ही माहिती बँक ऑफ महाराष्ट्रचे व्यवस्थापकीय संचालक रविंद्र मराठे आणि रिलायन्स निप्पॉन लाईफ इन्शुरन्सचे कार्यकारी संचालक आशिष व्होरा यांनी एका पत्रकार परिषदेत शनिवारी दिली.

मराठे म्हणाले की, रिलायन्स निप्पॉनशी झालेल्या या भागीदारीमुळे विमा संरक्षण, बचत आणि गुंतवणूक अशा पूरक वित्तीय सेवा आम्ही आमच्या ग्राहकांना सादर करू शकू. विमा या



**विमा व्यवसायातील भागीदारीबाबत माहिती देताना रिलायन्स निप्पॉनचे आशिष व्होरा व बँक ऑफ महाराष्ट्रचे रवींद्र मराठे.**

क्षेत्राचा देशात पुरेसा विकास झालेला नाही. त्यामुळे बँकेला मोठी बाजारपेठ उपलब्ध आहे. बँकेच्या नेहमीच्या व्यवसायाबरोबरच हे पूरक उद्योग करून बँकेला आपले उत्पन्न वाढविण्याची संधी आहे. पुढील वर्षीपर्यंत या विमा व्यवसायातून १०० कोटींचे उत्पन्न मिळेल, असा विश्वास वाटतो.

महाराष्ट्र बँकेत गेल्या काही काळात नव्याने युवकांची भरती झाली आहे. यातील काहीजणांची विमा व्यवसायासाठी नियुक्ती करून त्यांना विशेष प्रशिक्षण देण्यात येईल, असेही मराठे यांनी सांगितले. महाराष्ट्र बँकेने आतापर्यंत भारतीय आयुर्विमा महामंडळाशी (एलआयसी) विमा विकण्याबाबत करार केला होता. तसेच बँकेने अविवा या खासगी कंपनीशीदेखील या संदर्भात करार केलेला आहे. रिलायन्स निप्पॉनशी बँकेचा हा तिसरा करार आहे, असेही ते म्हणाले.

भागीदारी संदर्भात व्होरा म्हणाले, बँक ऑफ महाराष्ट्रने आम्हास मोठी संधी उपलब्ध करून दिलेली असून आम्ही या संधीचा फायदा करून घेण्यासाठी तांत्रिकदृष्ट्या सक्षम प्रक्रियांची उपाययोजना केलेली आहे. आम्ही देऊ करत असलेले दीर्घकालीन संरक्षण आणि खात्रीच्या परताव्याची उत्पादने बँकेच्या उत्पादनाशी पूरक असतील. बँकेच्या ग्राहकांच्या नेमक्या गरजा लक्षात घेऊन काही विशेष उत्पादने उपलब्ध करून देऊ. रिलायन्स निप्पॉनच्या ५४ शाखा महाराष्ट्रात आहेत.

सार्वजनिक बँकेच्या क्षेत्रात कंपनीने केवळ महाराष्ट्र बँकेशीच करार केला असल्याचे व्होरा यांनी सांगितले.